# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र. १६/२०२५ दिनांक ११/०१/२०२५

## Credit Card द्वारे फसवणुक झालेल्या तक्रारदार यांना २,३३,८४५/- रक्कम परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील नयानगर पोलीस ठाणेचे हद्दीतील तक्रारदार नामे श्री.सिंग यांचे मोबाईलवर अनोळखी लिंक प्राप्त झाली. तक्रारदार यांनी लिंकवर क्लिक केले असता त्यांचे मोबाईलमध्ये एक ॲप डाऊनलोड झाले. त्यानंतर त्यांचे क्रेडिट कार्डाचे खात्यातुन एकुण २,३३,८४५/- रक्कम कपात झाल्याबाबत मॅसेज प्राप्त झाला. तक्रारदार यांना त्यांची फसवणुक झाल्याचे लक्षात आल्याने तात्काळ सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज दिल्याने तात्काळ नोंद घेण्यात आली.

**(सायबर पोलीस ठाणे अर्ज आवक क्र.४०-बी/२०२५ दिनांक १०/०१/२०२५)**

तक्रारदार यांचे झालेल्या व्यवहाराची माहिती घेतली असता तक्रारदार यांची रक्कम Online Shopping Destination E-commerce च्या माध्यमातुन वापरण्यात आल्याचे दिसुन आले. तसेच तक्रारदार यांचे मोबाईलमध्ये डाऊनलोड झालेल्या अनोळखी ॲपद्वारे संशयीत इसमाने तक्रारदार यांची रक्कम काढुन घेण्यात आली होती. तक्रारदार यांचे व्यवहाराची माहिती घेवुन तात्काळ संबंधितांसोबत पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांचे खात्यातुन झालेला व्यवहार रद्द होवुन रक्कम तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्याबाबत कळविण्यात आले.

**अश्याप्रकारे सायबर पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांची रक्कम परत मिळविण्याकरीता तात्काळ कारवाई करुन फसवणुक झालेली रुपये २,३३,८४५/- रक्कम त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.**

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **अनोळखी लिंक प्राप्त झाल्यास त्या अनुषंगाने कोणतीही कारवाई करुन नये.**
- **आपले बँक खात्याबाबत वा इतर वैयक्तीक माहीती देवू नये.**
- **क्रेडीट कार्ड, डेबिट कार्डद्वारे फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**
- **कोणत्याही ॲपची पडताळणी केल्याशिवाय डाऊनलोड अथवा Investment ॲपमध्ये गुंतवणुक करु नये.**
- **जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणा-या कोणत्याही ट्रेडिंग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेडिंग ॲपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.**
- **facebook, Watsapp, Instagram अथवा Telegram Channel, वर जास्त परतावा देणा-या Promotional Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.**
- **Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds मधील गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.**
- **फसव्या एमएसएसला,कॉल प्रतिसाद देवू नका.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/ स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, पोअं/राहुल बन, मपोहवा/माधुरी धिंडे यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

---------------oo--------------------